माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१२०१/२४/त.क्र.४६/२५ ।**

**श्री.विकास नारायणराव घुगे**
अध्यक्ष, प्रहार शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य
जय विजय कॉ.ऑ.हौ.सो. फ्लॅट नं.६०३, ठाणेकरवाडी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पू.), मुंबई-४०० ६०३.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
बृ.मुं.म.पा. शिक्षण विभाग, उपशिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,
त्रिवेणी संगम म.न.पा. शालेय इमारत, महादेव पालव मार्ग,
करी रोड (पू.), मुंबई-४०० ०१२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती)
बृ.मुं.म.पा. शिक्षण विभाग, उपशिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,
त्रिवेणी संगम म.न.पा. शालेय इमारत, महादेव पालव मार्ग,
करी रोड (पू.), मुंबई-४०० ०१२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

दि.३०.१२.२०२४ रोजी दाखल कलम १८ (१) (ख) व च अन्वये दाखल केलेल्या प्रस्तुत तक्रारीवर आज सुनावणी ठेवण्यात आली आहे. मात्र तक्रारदार श्री.विकास घुगे यांनी दि.२६.०८.२०२४ रोजी पारित आदेशाची अंमलबजावणी न झाल्यानंतर तसेच उपरोक्त सुनावणीच्या आदेशात नमूद परिच्छेद १ व २ ज्यात **खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत:**

१. माहितीचा अधिकार अनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (२) नुसार उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती) यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "**अ**" मध्ये पागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस व्यक्तीशः विनामूल्य द्यावी. तसेच जी माहिती उपलब्ध होत नाही त्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (ईओआर) उपविभाग यांनी माहिती अर्जावर विहित पुदतीत नियमानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरूध्द अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार कारवाई का करणेत येवू नये? या बाबतचा खुलासा आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृतो दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

उपरोक्त निर्देशांचे अनुपालन झाले नसल्याने व त्यात खुलासा देखील सादर केला किंवा कसे याची विचारणा केलेली असून अपिलकर्ता यांनी त्यांचा अपिल अर्ज व तक्रार अर्ज यावर संयुक्त सुनावणी घेणे तसेच त्यांच्या लेखी निवेदनात तात्काळ कागदपत्र उपलब्ध करुन देणे व संबंधित अधिकाऱ्यांवर सदर प्रकरणाची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग/ लाचलुचपत विभाग / सी.बी.आय. / एस.आय.टी. द्वारे चौकशी करण्याबाबत आदेश पारित करावेत अशीही विनंती केली असून अपिलकर्ता श्री.घुगे यांनी शासन राजपत्रातील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्याबाहेरील व्यक्तींना अपात्र असताना अवैध पध्दतीने मिळालेल्या आरक्षण व नोकरी संदर्भात कुठलीच माहिती दिली नसल्याचा आक्षेप यात नोंदविला आहे.

अपिलकर्ता यांच्या मूळ निवेदनात महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी व्यक्तींनी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी व्यक्तींना महाराष्ट्रातील अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती भटक्या जमाती (VJNT), इतर मागासवर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC), NT-C, NT-D आदी प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय नोकरी मिळण्यास पात्र नाहीत. तथापि, बनावट जात प्रमाणपत्र धारण करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या विविध शाळांमध्ये अशा प्रकारच्या तब्बल ३७० व्यक्तींनी नोकरी मिळविली असल्याने शासनाच्या कोषावर तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीवर थेट आर्थिक दायित्व निर्माण झाले असून अशा प्रकारच्या खोटे जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र वापरून नोकरी मिळवली असेल तर त्याविरुद्ध भारतीय दंड संहितेनुसार (IPC कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ इ.) फौजदारी कारवाई करुन अशा व्यक्तींची शासकीय नोकरी तात्काळ रद्द करण्याची तरतूद असल्याचेही अपिलकर्ता यांनी नमूद केले असून ज्या अधिकारी/ विभागाने अशा बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे नेमणूकीस मान्यता दिली अथवा माहिती लपविली, तर अशाही अधिकाऱ्यांवर देखील शिस्तभंग व फौजदारी कारवाई होणे बंधनकारक असल्याचे नमूद करीत त्यांच्या लेखी निवेदनात दोषी व्यक्तींविरुध्द अशा व्यक्तींना पाठबळ देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द उच्चस्तरीय चौकशीचे आदेश, शिस्तभंगाची, विभागीय व फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश, बनावट प्रमाणपत्रांमुळे झालेल्या बेकायदेशीर नोकरी नियुक्तीची EOW व ACB मार्फत स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश इ. मागण्या केलेल्या आहेत.

**आज दि.२३.०९.२०२५** रोजी झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या संधर्भात माहिती संकलित स्वरूपात उपलब्ध नसल्याचे तसेच ती २४ विभागात उपलब्ध असल्याची बाब नमूद केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलकर्ता/तक्रारदार यांनी दाखल केलेला मूळ माहिती अर्ज यावर पारित केलेला आदेश याचे तात्काळ अनुपालन होणे आवश्यक असून यात ३७० च्या जवळपास कर्मचाऱ्यावर वैध प्रमाणपत्र नसताना नोकरी प्रदान करण्यात आली असल्याची ही बाब अतिशय गंभीर असून त्यामुळे बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या व पर्यायाने शासनाच्या तिजोरीवर अपात्र असलेल्या लोकांच्या वेतन, इतर भत्ते व सेवा विषयक अनुषंगिक लाभ याचा विनाकारण ताण पडत असून शासकीय सेवेत ज्यांची निवड केली जाते त्यांनी त्यांच्या पात्रतेच्या संदर्भात सादर केलेली सर्वच कागदपत्रे ही ते पात्र आहेत किंवा कसे यासाठी उघड करणे ही पारदर्शकतेच्या दृष्टीने तसेच अशा निवड प्रक्रियेत झालेला कथित गैरव्यवहार अथवा कथित भ्रष्टाचार दूर करण्याच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असून याच संदर्भात **नागपूर खंडपिठाने व अमरावती खंडपिठाने केशवराजे निंबाळकर विरुद्ध विविध प्राधिकरणे** यात **खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे:**

"प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेल्या जोडपत्र **अ** मध्ये अपिलार्थी ॲड.केशव राजेनिंबाळकर यांनी मागितलेली माहिती ही आपल्या अधिनस्त कार्यालयात दिव्यांग या संदर्भातील नियुक्ती झालेल्या व्यक्ती विषयी

असल्यामुळे अशा संवर्गातील नियुक्ती देतांना संबंधित व्यक्तीने सादर केलेली प्रमाणपत्रे, युनिक डिसअॅबिलीटी आयडेन्टीटी कार्ड (Uniq Disability ID Card), व इतर कागदपत्रांची मागणी केली असून, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी अॅड.केशव राजेनिंबाळकर यांनी मागणी केलेली माहिती ही शासकिय सेवेमध्ये दिव्यांग संवर्गातून रुजू झालेल्या व्यक्ती संदर्भात असल्यामुळे शासनाच्या धोरणानूसार योग्य व पात्र उमेदवारांना त्या त्या संवर्गासाठी राखीव असलेल्या जागांना प्रवेश मिळाले किंवा कसे हे जाणून घेण्याचा अधिकार हा नागरिकांना आहे व त्यामुळे अपिलार्थी अॅड.केशव राजेनिंबाळकर यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत जोडपत्र **अ** मधील माहिती ही खर तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील **कलम ४ (१)** नुसार स्वयंप्रेरणेने उघड करणे अपेक्षित असून, या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी **रिट पिटीशन (सिव्हील) ९९०/२०२१ किशनचंद जैन विरुध्द युनियन बैंक ऑफ इंडीया** यात दि.१७.०८.२०२३ रोजी दिलेल्या आदेशात सर्व सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे अखत्यारित असलेले (Information Held by Such Authorities) ही स्वयंप्रेरणेने उघड करुन शक्यतो स्वतःच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा कार्यालयात नागरिकांना ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक असून, संबंधित माहिती अर्जाचा विषय हा दिव्यांग संवर्गातून शासकिय सेवेत रुजू झालेल्या उमेदवाराविषयी असल्याने त्यासंबंधीत उमेदवारांची दिव्यांग संवर्गात असल्याविषयीची कागदपत्रे ही प्रथमदर्शनी **कलम ८ (१) (ज)** अन्वये खाजगीपणाच्या हक्कावर हस्तक्षेप करित असेल, असे वाटत असेल तरी ती उघड केल्याने साध्य होणारे व्यापक जनहित हे **कलम ८ (२)** च्या तरतुदीनुसार अधिक व्यापक असल्याने व अशी माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानिपेक्षा अधिक असेल तर ती जन माहिती अधिकारी यांना उघड करण्याची कायद्यातील तरतूद लक्षात घेता विषयांकीत माहिती ही शासकिय सेवा, त्यात झालेली भरती व विशिष्ट दिव्यांग संवर्गात उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार देण्यात आलेली सूट याबाबतीतील असून अशा पदांवर नियुक्त झालेले उमेदवार हे त्या संवर्गातीलच असल्याविषयी त्यांनी केलेली कागदपत्रे ही खाजगी स्वरुपाची असू शकत नाही. त्यामुळे वरील कागदपत्रे ही संबंधित प्राधिकरणाने केवळ अपिलार्थीस देणे अपेक्षीत नसून, ती स्वतःच्या शासकीय अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तसेच याबाबतीत अपिलार्थी हे स्वतःही दिव्यांग संवर्गातील असून, मागितलेल्या माहितीत कुठलाच वैयक्तीक हेवादावा आढळून येत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जारी करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या सर्वच विभागांवर विभाग खाते तसेच शासनाच्या अखत्यारितील विविध प्राधिकरणे यात अनेक संवर्गातून पद भरती केली जाते त्यातून ज्या ज्या संवर्गासाठी ज्या जागा राखीव आहेत तेथे पात्र व सूयोग्य उमेदवार यांची निवड होते किंवा कसे याची पदभरती करणाऱ्या संस्थेव्यतिरिक्त सार्वजनिक अंकेक्षण (Public Audit) होणे आवश्यक होण्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना देखील याबाबतीत संवर्ग निहाय माहिती करीत असतांना व विशेषतः ज्यांना विशेष सूट दिली जात आहे अशा संवर्गाविषयी म्हणजेच दिव्यांग, क्रिडा व इतर तत्सम यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे इत्यादीबाबत मागील काही वर्षांपासून उद्भवलेले वाद तसेच काही प्रकरणांमध्ये खोटे किंवा दिशाभूल करणारी प्रमाणपत्रे सादर करण्याच्या घडलेल्या घटना लक्षात घेता, अशा संवर्गामधील व्यक्तींनी सादर केलेली प्रमाणपत्रे ही त्यांच्या नियुक्ती आदेशाबरोबरच सार्वजनिक संकेतस्थळावरच उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. यास्तव तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे."

शासकीय सेवेत रुजू होण्याऱ्या सर्वच संवर्गाच्या व्यक्तींनी त्या संवर्गाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने सादर केलेली कागदपत्रे ही स्वयं प्रेरणेने **कलम ४ (१) ख** अन्वये संबंधीत प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरच

उघड करणे अपेक्षित असून विशेषत: दिव्यांग / क्रीडा मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, जमाती, भटके वर्ग व विशेष मागासले व आर्थिकदृष्ट्या कमकुवत या वर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांवर व सर्वसाधारण जागांवर देखिल ज्यांची नियुक्ती ही शासन / निमशासकीय / नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था द्वारा केली जाते व ज्यात ज्यांचे वेतन, वेतन अनुषंगिक लाभ ही शासकीय तिजोरीतून अथवा शासनाकडून प्राप्त निधी / अनुदान याद्वारे दिल्या जातात त्यांनी तर अशा सर्व प्रकरणी स्वयंप्रेरणेने अशा प्रकारची माहिती उघड करून केवळ पात्र व्यक्तींचीच निवड झाली आहे या बाबतीत पुढाकार घेणे आवश्यक आहे.

तसेच, अपिलकर्ता यांनी त्यांच्या मूळ **जोडपत्र अ** मध्ये नमूद केलेली बाब म्हणजे त्यांनी तत्कालिन मा.मुख्यमंत्री श्री.उध्दव ठाकरे, तत्कालिन गृह मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील, तत्कालिन शिक्षण मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड, तत्कालिन शिक्षण राज्यमंत्री श्री.बच्चू कडू तसेच तत्कालिन बृहन्मुंबई महानगर पालिका आयुक्त यांच्याकडे प्रहार शिक्षक संघटना, महाराष्ट्र द्वारे केलेल्या तक्रार / निवेदनावर करण्यात आलेली कारवाई या संदर्भात असून अशा प्रकारचे निवेदन अथवा तक्रार जेव्हा नागरिकांकडून प्राप्त होतात या संदर्भात करावयाची कार्यवाही याबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग दि.१८.०१.२०१३ यात तत्कालिन मा.मुख्य सचिव यांनी निर्गमित केलेल्या **परिपत्रकातच स्वयंस्पष्ट दिशा निर्देश दिले असून ते खालीलप्रमाणे आहेत:**

१) शासनाकडे आलेल्या निवेदने/अर्जावर शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.संकीर्ण-०२/२०१०/प्र.क्र.२९/अ-२ दि.१६.०२.२०१० मधील तरतुदीनुसार १२ आठवडयात निर्णय घेऊन अंतिम उत्तर देण्यात यावे. अपवादात्मक परिस्थितीत त्या प्रकरणी १२ आठवडयात अंतिम उत्तर देणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत त्या प्रकरणी अंतिम उत्तर देणे का शक्य नाही याचा खुलासा संबंधित अर्जदारास करण्यात यावा.

२) अशी निवेदने/अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराने न्यायालयात याचिका दाखल केल्यास अशी याचिका दाखल केल्यापासून ४ आठवडयात सदर अर्जावर कोणत्याही परिस्थितीत अंतिम निर्णय घेण्यात यावा व अर्जदारास अंतिम उत्तर देण्यात यावे.

३) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात जनतेच्या निवेदने/अर्जाच्या नोंदीकरिता स्वतंत्र नोंदवही (Register) ठेवण्यात यावे.

४) उक्त नोंदवहीत नोंदविलेल्या निवेदने/अर्जावर कार्यवाही केली जाते किंवा नाही याचा आढावा कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखाने दरमहा घ्यावा.

५) दरमहा घेतल्या गेलेल्या आढाव्याचा संक्षिप्त अहवाल प्रत्येक अधिकाऱ्याने त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करावा. उदा.जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांकडे, विभाग प्रमुखांनी विभागाच्या सचिवांकडे.

६) जनतेच्या निवेदने/अर्जाच्या निपटाऱ्याबाबत अधिकारी/कर्मचारी हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असेल अगर निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असेल तर अशा अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

७) उक्त १ व २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या निवेदने/अर्जाच्याबाबत कार्यवाही करावयाची आहे. त्यामध्ये नोंकरी अगर सेवाविषयक पत्रांचा अंतर्भाव करण्यात येऊ नये.

८) वरील सूचनांचे सर्व स्तरावरून काटेकोर पालन करण्यात यावे.

तसेच अनेकदा शासनाकडील विविध प्राधिकरणे, मा.मुख्यमंत्री कार्यालये, मा.मंत्री कार्यालये, वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे निनावी व खोटया तक्रारी व खोटया सहीने केलेल्या तक्रारी या देखिल प्राप्त होत असल्याची वस्तुस्थिती असून या संदर्भातील महाराष्ट्र शासनाने दि.२५.०२.२०१५ रोजी स्वयंस्पष्ट निर्देश दिलेले असून उपरोक्त **शासन परिपत्रक खालीलप्रमाणे आहे:**

निनावी व खोट्या तक्रारी, खोटया सहीने केलेल्या तक्रारी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबतची माहिती संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. केंद्र शासनाने दिनांक 18.10.2013 च्या शासन ज्ञापनान्वये निनावी व खोटया तक्रारी, खोटया सहीने केलेल्या तक्रारी आणि सार्वजनिक हित, प्रसिध्दी व माहिती देणा-यास संरक्षणाबाबतचे आदेश २००४ **(PIDPI)** यामधील सूचना विचारात घेऊन कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर सूचनांच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत मार्गदर्शक सूचना देण्याची बाब विचाराधीन होती त्यानुसार संदर्भाधीन शासन परिपत्रके अधिक्रमित करून पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

१) ज्या तक्रारीमध्ये तक्रारदाराचे नाव व पत्ता नमुद केलेला नाही अशा निनावी तक्रारीमध्ये कोणत्याही स्वरूपाची तक्रार/माहिती अंतर्भूत असली तरी त्यावर कार्यवाही करण्यात येऊ नये. अशा तक्रारी दफ्तरी दाखल करण्यात याव्यात.

२) ज्या तक्रारीमध्ये असंबध्द (vague) आरोप आहे अशा तक्रारीदेखील तक्रारदाराची तपासणी न करता दफ्तरी दाखल करण्यात याव्यात.

३) ज्या तक्रारीमध्ये पडताळणी करता येवू शकेल असे आरोप केलेले आहेत अशा तक्रारीचे संबंधात प्रशासकीय विभाग/मंत्रालयाने त्याची दखल घ्यावी. अशा प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सदरहू तक्रार तक्रारदाराकडे पाठवून ती त्यांने स्वतः केली आहे काय याबाबत खात्री करून घेण्यात यावी. तक्रारदाराकडून १५ दिवसांमध्ये प्रतिसाद मिळाला नाही तर स्मरणपत्र पाठविण्यात यावे व तद्नंतर १५ दिवसांची प्रतिक्षा केल्यानंतर देखील माहिती प्राप्त न झाल्यास सदरहू तक्रार खोटया नावाची (Pseudonymous) तक्रार असल्याचे नमुद करून दफ्तरी दाखल करण्यात यावी.

४) तक्रारदाराने आपण स्वतः तक्रार केल्याचे मान्य केल्यास अशा तक्रारीवर कार्यवाही करताना तक्रार अर्जातील अर्जदाराचे नाव व पत्ता झाकुन तक्रारीची छायांकित प्रत काढुन ती चौकशीसाठी संबंधित यंत्रणेकडे पाठवावी व पुढील कार्यवाही करावी.

प्रस्तुत प्रकरणी अपिलकर्ता / तक्रारदार यांनी केलेल्या निवेदनात नमूद विषय व त्यांच्या म्हणण्यानुसार ३७० कथित रुपाने अपात्र व महाराष्ट्राचे रहिवासी नसलेली ( डोमिसाईल ) कर्मचाऱ्यांची त्यांच्या कर्मचारी संकेतांक, ते कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई पालिकेद्वारा संचलित शाळा व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या जात प्रवर्गासह तपशील दिले असून **दि.२४.०८.१९९५ व १२.१२.२०१४** रोजीच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय यांनी अन्य राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत व्यक्तींना मागासप्रवर्गाचे कोणतेही फायदे देय होत नसल्याबाबत परिपत्रक जारी केले असून उपरोक्त परिपत्रकाच्या आधारे अपिलकर्ता/तक्रारदार यांनी त्यांच्या निवेदनावर कार्यवाही करण्याबाबत तसेच दि.२६.०८.२०२४ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदविला असून आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या बाबतीत कुठलीच माहिती ही **कलम २ (च) प्रमाणे** कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसून ती वेगवेगळया विभाग तसेच वेगवेगळया आस्थापनेवर उपलब्ध असून ती संकलित करण्यास कालावधी लागणार असल्याचे नमूद केले आहे. वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार केला असता अशा प्रकारची माहिती संकलित करुन प्रदान करण्याविषयी दि.२६.०१.२०२४ रोजी या आधीच सुस्पष्ट आदेश दिलेले आहेत. त्याचे अनुपालन करणे महानगरपालिकेस बंधनकारक असून या आधीच उल्लेखित केलेल्या दि.१८.०१.२०१३ रोजीच्या तत्कालिन मा.मुख्य सचिव यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने अपिलकर्ता/तक्रारदार यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या विविध शाळांमधील नियमाबाह्य रुपाने नेमणूक झालेल्या अपात्र व्यक्तीं बाबत चौकशी करण्यासंदर्भात दिलेल्या निवेदनावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या

विद्यमान मा.आयुक्त यांनी प्रचलित नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी तसेच अपिलार्थी यांनी अशा प्रकारची नेमणूकांमुळे शासकीय तिजोरीवर विनाकारण पडणारा भार व महाराष्ट्रातील मागास प्रवर्गातील उमेदवारांवर झालेला कथित अन्याय इ. विषयांची पडताळणी देखिल प्रचलित नियमानुसार करण्याची सूचनेसह व अपिलकर्ता/तक्रारदार यांनी दि.१७.०८.२०२३ रोजीच्या निवेदनाची एक प्रत उपरोक्त आदेशासह विद्यमान मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे अग्रेषित करावी तसेच प्रस्तुत प्रकरणी दि.२६.०८.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील १५ दिवसाच्या आत कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य प्रदान करावी. यातील जी माहिती **सॉफ्ट कॉपी** स्वरूपात उपलब्ध आहे ती अपिलकर्ता यांना त्यांच्या **ई-मेल** वर **पेनड्राईव्ह**मध्ये द्यावी व जी माहिती केवळ कागदोपत्री उपलब्ध आहे मात्र कलम ७ (९) वरील तरतूदीचा विचार करता ती विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात असण्याची शक्यता लक्षात घेता वरील आदेश प्राप्त होताच लवकरात लवकर त्याची छायांकित प्रत कलम ७ (६) नुसार अपिलकर्ता/तक्रारदार यांना विनामूल्य प्रदान करावी. वरील आदेश व सुनावणी दरम्यान जारी करण्यात आला होता तथा उपरोक्त आदेश आयोगाकडून निर्गमित होण्याआधी अपिलकर्ता/तक्रारदार यांच्या निवेदनात ज्यांचा नामोल्लेख झालेला आहे अशा अनेक व्यक्तींनी कलम ८ (१) (त्र) नुसार मागितलेली माहिती त्यांची वैयक्तिक असून त्यांची प्रमाणपत्रे व कागदपत्रे कुठल्याही त्रयस्थ व्यक्तींना देण्यात येवू नये अशा प्रकारचे अर्ज दाखल केले असून मूळ आदेश हा दि.२३.०९.२०२५ रोजीच जारी करण्यात आला आहे. त्यात कलम ८ (१) व ८ (२) यांचा विचार करण्यातआला असून जी माहिती उघड केल्याने साध्य होणारे व्यापक जनहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असेल तर अशा प्रकारची माहिती उघड करण्यासंदर्भात कायद्यातील सुस्पष्ट तरतूद लक्षात घेता उपरोक्त प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग व त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकातील निर्देश हे अर्थातच याला लागू होणार नाहीत.

**आदेश**

१. **वरील विवेचनानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २३.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्राप्त झालेली निवेदने तथा आक्षेप हे आदेश पारित केल्यानंतर कार्यालयाला दि.०९.१०.२०२५ रोजी प्राप्त झाले असून त्याची दखल घेण्याची प्रथम दर्शनी कुठलीही आवश्यकता आढळून येत नाही.